# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 26.06.2025** **वार-गुरुवार**

---

**पुणेमनपा**

पुण्यातील फुरसुंगी- उरुळी देवाची नगर परिषदेच्या विकासासाठी आणि पुणे महानगरपालिका हद्दीत समाविष्ट झालेल्या 23 गावांच्या विकासासाठी प्रत्येकी 5 कोटी रुपये देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. समाविष्ट २३ गावातील थकीत कराची वसुली करण्यासाठी तातडीने अभय योजना राबवावी आणि नगरविकास विभागाच्या सूत्रानुसार कर आकारणी करावी असे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महापालिका आयुक्तांना दिले आहेत. पुणे महापालिका हददीतील गावांच्या विविध प्रश्नांबाबत एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत काल सह्याद्री अतिथीगृहात विशेष बैठक पार पडली. त्यामध्ये हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला.

**पेरण्या**

राज्यात सर्वदूर झालेल्या चांगल्या पावसामुळे आत्तापर्यंत २३ टक्के म्हणजे ३३ लाख ५९ हजार ८१ हेक्टर जमिनीवर खरीपाच्या पेरण्या पूर्ण झाल्या आहेत. गेल्या वर्षी याच दिवशी १९ टक्के क्षेत्रावर पेरण्या झाल्या होत्या. राज्यात सर्वात कमी पेरण्या कोकण विभागात आणि सर्वाधिक पेरण्या पुणे विभागात झाल्या आहेत. कोकणात १६ हजार ७९ हेक्टर , तर पुणे विभागात चार लाख ५१ हजार ५०७ हेक्टर क्षेत्रावर पेरण्या झाल्या आहेत.

**<u>राजर्षी शाहूमहाराज</u>**

छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त आज पुण्यात त्यांना अभिवादन करण्यात येत आहे. पुणे महापालिकेचे आयुक्त नवल किशोर राम यांनी महापालिकेतील राजर्षी शाहू महाराज यांच्या तैलचित्राला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. महापालिकेचे उपायुक्त संदीप कदम यांच्यासह अधिकारी आणि कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

पुरस्कार-प्रेसनोट-माधवी

छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त फुले-शाहू-आंबेडकर विचार मंचातर्फे दिल्या जाणाऱ्या छत्रपती शाहू महाराज पुरस्काराची घोषणा करण्यात आली आहे. महाराष्ट्र रिक्षा पंचायतीचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब कांबळे यांना हा पुरस्कार येत्या 2 जुलै रोजी प्रदान करण्यात येईल.

**<u>आरपीआय</u>**

आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटातर्फे पुणे शहर कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे. पक्षाच्या शहर सरचिटणीसपदी महिपाल वाघमारे आणि शाम सदाफुले यांची, तर शहर कार्याध्यक्षपदी वसंत बनसोडे आणि बसवराज गायकवाड यांची निवड केल्याची माहिती पक्षाचे शहराध्यक्ष संजय सोनावणे यांनी दिली.

<u>Pcmc</u>

भारतरत्न पंडित भीमसेन जोशी संगीत अकादमीच्या वर्धापन दिनाचं औचित्य साधून पिंपरी चिंचवड महापालिकेनं विविध कार्यक्रमांचं आयोजन केलं आहे. या महोत्सवाचं उद्घाटन पालिका आयुक्त शेखर सिंह यांच्या हस्ते झालं. पंडित सुरेश तळवलकर यांच्या तालयात्रा या कार्यक्रमाने महोत्सवाची सुरुवात झाली. यानंतर ज्येष्ठ शास्त्रीय गायिका पद्मजा फेणाणी जोगळेकर यांनी बंदिशी सादर केल्या. या कार्यक्रमांना रसिकांनी भरभरून प्रतिसाद दिला.

**कीटकजन्य आजार**

पावसाळा सुरू होताच डेंग्यू, मलेरिया, चिकनगुनिया यांसारख्या आजारांचा धोका वाढतो. या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आरोग्य विभागानं प्रतिबंधात्मक उपाययोजना राबवण्यास सुरुवात केली आहे. डेंग्यूचा प्रादुर्भाव रोखण्याबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात येत आहे. नागरिकांनी आपला घरचा आणि आजूबाजूचा परिसर स्वच्छ ठेवावा आणि आठवड्यातून एक दिवस हा 'कोरडा दिवस' पाळावा, असं आवाहन महापालिकेचे वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे यांनी केलं आहे.

**अमली पदार्थ**

पुण्यातील स्वारगेट परिसरात अमली पदार्थांची विक्री करणाऱ्या एकाला पोलिसांनी ताब्यात घेतलं असून त्याच्याकडून ६ किलो अमली पदार्थ जप्त केले आहेत. या प्रकरणी चौकशीनंतर वेळापूर, पंढरपूर इथून त्याच्या साथीदारांनाही पोलिसांच्या विशेष पथकानं पकडलं असून त्याच्याकडून १६ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

**जन जागृती फेरी**

सामाजिक समावेशकतेला चालना देण्यासाठी राउंड टेबल इंडिया या संस्थेनं पुण्यात दृष्टीबाधितांसाठी 'बियाँड साईट', ही आगळीवेगळी कार रॅली आयोजित केली आहे. येत्या रविवारी सकाळी १० वाजता अमनोरा पार्क इथल्या द फर्न क्लब इथून ही कार रॅली सुरू होईल, अशी माहिती राउंड टेबल इंडियाचे अध्यक्ष अंशुल मंगल यांनी आज पुण्यात पत्रकार परिषदेत दिली. या रॅलीमध्ये ५० वाहनचालक सहभागी होणार आहेत. या उपक्रमात दृष्टि असलेल्या व्यक्ती कार चालवणार आहेत, आणि दृष्टिहीन व्यक्ती स्मार्टफोनवरून मिळणाऱ्या सूचना ऐकून वाहन चालकाला मार्ग दाखवणार आहेत.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज दिवसभर ढगाळ वातावरण आहे. आज कमाल तापमान 30 आणि किमान तापमान 24 अंश सेल्सियस नोंदवण्यात आलं. उद्याही शहर परिसरात आकाश ढगाळ राहून हलका पाऊस पडेल तर घाट परिसरात तुरळक ठिकाणी मुसळधार पावसाचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**